# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र. ३२५/२०२३/छ.संभाजीनगर**
**(द्वितीय अपील क्र.९४६०/२०२२ मध्ये)**

सौ. अनिता नितीन वानखडे, : तक्रारदार
रा. रामनगर,पैठण ता.पैठण,
जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी

**निर्णय**

**(सुनावणी दि. १६.०५.२०२४)**

तक्रारदार यांनी दि.०९.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.त्यामध्ये "तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.
व्दितीय अपील सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये तक्रारी अर्ज दाखल करीत आहे."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही,अशी तक्रार करुन संबंधितावर नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने व्दितीय अपील क्र.९४६०/२०२२ मध्ये दि.१६.०३.२०२३ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहा. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृदु व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. "

सदर प्रकरणावर आज दि.१६.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदर सुनावणीला तक्रारदार सौ. अनिता नितीन वानखडे व श्री.अब्दुल बाशिद शेख विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद आणि जलसंधारण विभाग छत्रपती संभाजीनगर तसेच श्री.संदिप माणिकचंद राठोड, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग छत्रपती संभाजीनगर (सध्या कार्यरत उपविभागीय जलसंधारण अधिकारी उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद जलसंधारण उपविभाग पैठण जि.छत्रपती संभाजीनगर ) सुनावणीसाठी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांनी केलेल्या युक्तिवादानुसार त्यांना व्दितीय अपील क्र.९४६०/२०२२ मधील निर्णयानुसार अदयाप पर्यंत माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी कथन केले, तसेच विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी सहायक जिल्हा जलसंधारण

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

केले की, व्दितीय अपील निर्णयानुसार तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

उपरोक्त युक्तिवादवरुन असे स्पष्ट होते की, आयोगाच्या निर्णयाचे पालन झाले नसल्याचे दिसून येते. अधिनियमातील तरतुदीनुसार, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (७) नुसार आयोगाकडील निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक असुन अशा निर्णयाचे अनुपालन करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार त्यांची जबाबदारी **प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर** यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे.

सुनावणी वेळेस तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाच्या आदेशानतंर तक्रारदार यांना माहिती देण्याविषयी कोणत्याही प्रकाराचा प्रतिसाद दिला किंवा नाही, याबाबत आयोगासमोर समाधानकारक खुलासा ते देऊ शकले नाहीत. त्यामुळे या कृतीवरुन ते स्वत:हुन शिक्षेसाठी पात्र ठरत आहे.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणा-या ठरतात. या प्रकरणी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अशा सर्व कृती करुन अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस स्वत:ला पात्र ठरविलेले आहे. त्यामुळे तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना याप्रकरणी त्यांना लागू असलेल्या प्रचलित सेवानियमांन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१).उपरोक्त विवेचनानुसार तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्यावर या प्रकरणात लागू असलेल्या प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२).तसेच सदर कारवाई करण्याची जबाबदारी उपरोक्त शिफारसीनुसार, माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (८) (क) व १९(७) अन्वये आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. यानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग सत्यमेव जयते खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

( मकरंद रानडे )
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.३२५-२०२३/छत्रपती संभाजीनगर जावक क्र. 1852/२०२४ दिनांक : 12/6/2024

प्रत: माहिती तथा कार्यवाही/अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. तत्कालीन जन माहिती व विद्यमान तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना **मार्फत :-** आयुक्त मृद व जलसंधारण,छत्रपती संभाजीनगर
२. आयुक्त, मृद व जलसंधारण,छत्रपती संभाजीनगर वाल्मी,कांचनवाडी ,पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००५
३. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर